# जिल्हा निर्यात प्रचलन समिती सभा दि. १४.०८.२०२३ चे इतिवृत्त

जिल्हा निर्यात प्रचालन समितीची सभा मा.श्री.रघुनाथ गावडे (भाप्रसे), मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचे अध्यक्षतेखाली दि.१४.०८.२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, परभणी येथे संपन्न झाली. सभेच्या सुरवातीस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योगकेंद्र, परभणी यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन सभेस सुरवात केली.

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचलन समिती यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा निर्यात प्रचलन समिती मध्ये जिल्हयाच्या निर्यातीबाबत सदस्य सचिव यांनी माहिती दिली. परभणी जिल्हयाचे महाराष्ट्राच्या तुलनेत एकूण निर्यात ८०४.०० करोड असून राज्याच्या तुलनेत जिल्हयाचा जिल्याचा हिस्सा ३.०८% एवढा आहे असे सांगितले.

जिल्हयामध्ये मे.कोहीनुर रोप्स्, सेलू व मे.रिलायबल ॲग्रो फुड, पुर्णा हे निर्यातदार दोन उद्योजक असून त्यांचे मार्फत प्लास्टीक रोप्स् व बोनलेस बिफ निर्यात केली जातात. जिल्हयात कृषि मालावर आधारीत जसे ऊस, कापूस, ज्वारी, गुळ, सरकी तेल, हळद, कडधान्ये, सोयाबीन, दुग्धजन्य पदार्थ इ. उत्पादने घेतली जातात. एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत जिल्हयाकरीता हरभरा व गुळ ही दोन उत्पादने निवडण्यात आली आहेत. त्यानुषंगाने कृषि मालावर आधारीत उत्पादनांची निर्यात वाढ होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

त्यानुंषगाने जिल्हयातील निर्यातदार व खरेदीदार यांची एक दिवसीय कार्यशाळा उद्योजक संघटनेच्या सहकार्याने आयोजित करणे प्रस्तावित आहे. सदर कार्यशाळेत निर्यातीशी संबंधीत सर्व बांबीवर मार्गदर्शन करण्याकरीता डीजीएफटी पुणे, अपेडा या संस्थाची मदत घेण्यात येईल. तसेच तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन होण्यासाठी जिल्हास्तरावरील कृषि विज्ञान केंद्र, परभणी यांचे बरोबर सांमजस्य करार करण्यात आला असून शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर व अन्नतंत्र महाविद्यालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापिठ, परभणी यांचे बरोबर सांमजस्य करार करण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

तसेच मा.विकास आयुक्त(उद्योग), मुंबई यांचे अर्धशासकीय पत्र दि.१३.१०.२०२२ व दि.०८.०५.२०२३ च्या पत्रातील मुद्यांच्या अनुषंगाने सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हयामध्ये निर्यातवाढीच्या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम तयार करण्याचे ठरले. तसेच निर्यातवाढीकरिता करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचा आढावा पुढील होणाऱ्या जिल्हा निर्यात प्रचलन समिती मध्ये घेण्यात यावा. एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत निवडण्यात आलेल्या हरभरा व गुळ या उत्पादनांची निर्यात वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. जिल्हयातील उद्योजकांना निर्यातक्षम उत्पादनांची माहिती व्हावी व तांत्रिक सहाय मिळावे यासाठी स्थानिकस्तरावरील मार्गदर्शन करण्याऱ्या तांत्रिक संस्था समवेत सांमंजस्य करार करण्यात यावेत. सदर उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषि विज्ञान केंद्र, परभणी यांचे सहकार्याने मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करावे.

यानंतर निर्यातदारांच्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयात निर्यात प्रचालन कक्षाची सुरवात करण्यात आली असून निर्यात कक्षाच्या नामफलकाचे अनावर मा.जिल्हाधिकारी यांचे शुभहस्ते करण्यात आले. मा.जिल्हाधिकारी यांनी शुभेच्छा देवून जिल्हयातील सर्व निर्यातदार उद्योग घटकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. तसेच जिल्हयात निर्यातीस चालना मिळावी व त्यात वाढ होण्याकरीता निश्चित असा कालबध्द कार्यक्रम राबविण्यात यावा. यामध्ये उद्योजकांच्या मागणीनुसार निर्यात मालाच्या अनुषंगाने स्वंतत्र असे मार्गदर्शनपर सेमिनार आयोजित करावेत असे सांगितले.

शेवटी सभेस उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानून मा.अध्यक्षाचे परवानगीने सभा संपन्न झाल्याचे घोषित करण्यात आले.

महाव्यवस्थापक तथा सचिव,
जिल्हास्तरीय निर्यात प्रचलन समिती,जालना

मा.जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष,
जिल्हास्तरीय निर्यात प्रचलन समिती,जालना